गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ४३ वा ● शनिवार २९ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 43 | Date : 29/06/2024 blow Saturday Page 4 Price 4

# राज्याचा ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर

## अर्थसंकल्पात शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, युवक, महिला,मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक अशा सर्व घटकांना न्याय शेती, उद्योग, शिक्षण, व्यापार, आरोग्य, पर्यटन अशा विविध क्षेत्रांच्या विकासाला बळ

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाराष्ट्राची गौरवशाली आध्यात्मिक, सांस्कृतिक परंपरा असलेल्या वारकरी बांधवांसाठी 'मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ', पंढरपूर वारीचे जागतिक नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवण्याची घोषणा, वारीतल्या मुख्य पालख्यांतील दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपये, 'निर्मल वारी'साठी ३६ कोटींचा निधी, २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना प्रत्येकी दरमहा दीड हजार रुपये देणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना', महिलांना रिक्षा व्यवसायासाठी आर्थिक मदत देणारी 'पिंक ई-रिक्षा' योजना, राज्यातील ५२ लाख कुटुंबांना वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देणारी 'मुख्यमंत्री अन्नपूर्ण योजना', महिला लघुउद्योजकांसाठी 'पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी स्टार्टअप योजना', त्यांच्यासाठी १५ लाख कर्जापर्यंतच्या व्याजाचा परतावा, ओबीसी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना चालू वर्षापासून अभियांत्रिकी, वस्तुशास्त्र, फार्मसी, मेडीकल, शेतीविषयक सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक आणि परीक्षा शुल्काची संपूर्ण प्रतिपूर्ती, राज्यातील दहा लाख युवकांना प्रत्यक्ष कामावर प्रशिक्षण आणि दरमहा दहा हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन देणाऱ्या



'मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने'ची घोषणा, 'मुख्यमंत्री बळीराजा सवलत योजनें'तर्गत राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना मोफत वीजपुरवठा, दुधउत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर पाच रुपये अनुदान, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, नवी मुंबईत महापे येथे जेम्स ॲन्ड ज्वेलरी पार्कची निर्मिती, सिंधुदुर्ग येथे ६६ कोटींच्या आंतरराष्ट्रीय पाणबुडी केंद्राची तसेच स्कुबा डायव्हिंग केंद्राची निर्मिती, बारी समाजासाठी 'संत श्री रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळा'ची स्थापना, स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडावर दरवर्षी शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन, महाराष्ट्राचा अभिमान, स्वाभिमान उंचावणाऱ्या अशा अनेक निर्णयांचा समावेश असलेल्या, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, युवक, महिला, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक अशा सर्व घटकांना न्याय, शेती, उद्योग, शिक्षण, व्यापार, आरोग्य, पर्यटन अशा विविध क्षेत्रांच्या विकासाला बळ देणारा वर्ष २०२४-२५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी २७ फेब्रुवारी २०२४ रोजी चालू आर्थिक वर्षाचा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर अंतरिम अर्थसंकल्प सादर केल्यानंतर उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी आज अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला. उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी वित्त व नियोजनमंत्री म्हणून मार्च २०११ मध्ये पहिला अर्थसंकल्प सादर केला होता. तेव्हापासून त्यांनी आज सादर केलेला दहावा अर्थसंकल्प आहे.

उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणाची सुरुवातंच जगद्गगुरु संत तुकाराम महाराजांच्या 'उदंड पाहिले, उदंड ऐकिले उदंड वर्णिले, क्षेत्रमहिमे । ऐसी चंद्रभागा, ऐसे भीमातीर ऐसा विटेवर , देव कोठे ।। ऐसे संतजन , ऐसे हरिचे दास ऐसा नामघोष , सांगा कोठे । तुका म्हणें, आम्हां अनाथाकारणें पंढरी निर्माण, केली देवें ।।' या अभंगाने केली.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सादर केलेल्या २०२४-२५ या अतिरिक्त अर्थसंकल्पात एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यात महसूली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये तर, महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी रुपये अंदाजित करण्यात आला आहे. वार्षिक योजना कार्यक्रम खर्चासाठी एक लाख ९२ हजार कोटी रुपये आणि अनुसूचित जाती उपयोजनेकरीता १५ हजार ८९३ कोटी रुपये, आदिवासी विकास उपयोजनेकरीता १५ हजार ३६० कोटी रुपये तसेच जिल्हा वार्षिक योजनेसाठी १८ हजार १६५ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. महसुली तूट २० हजार ५१ कोटी रुपये, राजकोषीय तूट १ लाख १० हजार ३५५ कोटी रुपये आहे. शेतकऱ्यांसाठी । पान २ वर

## उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

* दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी राज्याचा २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता, आता सन २०२४-२५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करण्यात आला. * केंद्र सरकारच्या पहिल्याच मंत्रीमडंळ बैठकीत वाढवण बंदर प्रकल्पाला मंजूरी-एकूण किंमत ७६ हजार २०० कोटी रुपये -१० लाखांहून अधिक रोजगार निर्मिती. * अतिरिक्त अर्थसंकल्पात महिला, शेतकरी, युवा, मागास वर्ग आणि सर्व समाजातील गरिबांना भरीव आर्थिक मदतीवर भर.

**वारकरी बांधवांसाठी**

* पंढरपूरच्या वारीचा जागतिक वारसा नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव. * पंढरपूरच्या वारीला जाणाऱ्या मुख्य पालख्यातील दिंडींना प्रति दिंडी २० हजार रूपये. * 'निर्मल वारी' साठी ३६ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी. * मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून देहू-आळंदी ते पंढरपूर या दोन्ही मुख्य पालखी मार्गावरील सर्व वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार.

**महिलांसाठी विविध योजना**

* सन २०२३-२४ पासून 'लेक लाडकी' योजनेची सुरुवात- मुलीच्या जन्मापासून ती अठरा वर्षाची होईपर्यंत तिला टप्याटप्याने एकूण एक लाख एक हजार रुपये. * 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' २१ ते ६० वर्ष वयोगटातील पात्र महिलांना शासनामार्फत दरमहा दीड हजार रुपये-दरवर्षी सुमारे ४६ हजार कोटी रुपये निधी. * दिनांक १ मे, २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तीच्या नावाची नोंद शासकीय दस्तऐवजांमध्ये त्याचे नांव, आईचे नांव, वडिलांचे नांव व आडनांव या क्रमाने करण्याचे बंधनकारक. * पिंक ई रिक्षा - १७ शहरांतल्या १० हजार महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसहाय्य - ८० कोटी रुपयांचा निधी.* शुभमंगल सामुहिक नोंदणीकृत विवाह योजनेत लाभार्थी मुलींना देण्यात येणारे अनुदान १० हजार रुपयांवरून २५ हजार रुपये. * राज्यातील सर्व आरोग्य उपकेंद्रात स्तन व गर्भाशयमुखाच्या कर्करोग तपासणीसाठी उपकरणे व साहित्यासाठी ७८ कोटी रुपये. * रुग्णांची विशेषतः गरोदर माता व बालकांची आरोग्य संस्थेत मोफत ने- आण करण्यासाठी ३ हजार ३२४ रुग्णवाहिका. * जल जीवन मिशन कार्यक्रमातून ग्रामीण भागातील १ कोटी २५ लाख ६६ हजार ९८६ घरांना नळजोडणी पूर्ण- राहिलेल्या २१ लाख ४ हजार ९३२ घरांसाठीचे काम प्रगतीपथावर. * 'मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना'- वर्षाला घरटी तीन गॅस सिलेंडर मोफत देणार- ५२ लाख १६ हजार ४१२ लाभार्थी कुटुंबांना लाभ. * लखपती दिदी- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ७ लाख नवीन गटांची स्थापना- बचत गटांच्या फिरत्या निधीच्या रकमेत १५ हजार रुपयांवरुन ३० हजार रुपये वाढ. * महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना 'उमेद मार्ट' आणि 'ई-कॉमर्स ऑनलाईन प्लॅटफॉर्म' याद्वारे आतापर्यंत १५ लाख महिला 'लखपती दिदी', या वर्षात २५ लाख महिलांना लखपती करण्याचे उद्दीष्ट. * महिला लघुउद्योजकांसाठी 'पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना'- अखिल भारतीय स्तरावरील महासंमेलनाचे राज्यात आयोजन. * 'आई योजनेअंतर्गत' पर्यटन क्षेत्रातील महिला लघुउद्योजकांना १५ लाख रुपयापर्यंतच्या कर्जावरील व्याजाचा परतावा -१० हजार रोजगार निर्मिती. * मुलींना मोफत उच्च शिक्षण- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय तसेच कृषि विषयक सर्व व्यावसायिक पदवी-पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित. ८ लाख रूपयापर्यंतच्या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागासवर्ग तसेच, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये १०० टक्के प्रतिपूर्ती. * या निर्णयाचा अंदाजे २ लाख ५ हजार ४९९ मुलींना लाभ- सुमारे २ हजार कोटी रुपयांचा भार.

**शेतकऱ्यांसाठी विविध योजना**

* नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी जुलै, २०२२ पासून १५ हजार २४५ कोटी ७६ लाख रूपयांची मदत. * नोव्हेंबर - डिसेंबर, २०२३ मधील अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या २४ लाख ४७ हजार शेतकऱ्यांना २ हजार २५३ कोटी रुपयांची मदत. * नुकसानीच्या क्षेत्राची मर्यादा दोनऐवजी तीन हेक्टर करुन राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषापेक्षा अधिक दराने मदत. * खरीप हंगाम २०२३ करिता ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ तर १ हजार २१ महसूल मंडळांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून विविध सवलती लागू. * नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू. * 'नमो शेतकरी महासन्मान निधी योजने' अंतर्गत एकूण ९२ लाख ४३ हजार शेतकरी कुटुंबांना ५ हजार ३१८ कोटी ४७ लाख रुपये अनुदान. * 'एक रुपयात पीक विमा योजने' अंतर्गत ५९ लाख ५७ हजार शेतकऱ्यांना ३ हजार ५०४ कोटी ६६ लाख रुपये रक्कम अदा. * 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने' अंतर्गत २ हजार ६९४ शेतकरी कुटुंबांना ५२ कोटी ८२ लाख रुपयांचे अनुदान वाटप. * 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने' अंतर्गत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या १४ लाख ३३ हजार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम म्हणून ५ हजार १९० कोटी रुपये अदा केले, उर्वरित रकमेचे वाटप त्वरीत. * नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा ६ हजार कोटी रुपये किमतीचा दुसरा टप्पा २१ जिल्ह्यांत राबविण्यात येणार. * मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय । पान २ वर

## महाराष्ट्राला नवी दिशा देणारा निर्धाराचा अर्थसंकल्पः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : राज्याचा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने महिला, युवक, शेतकरी यांचा सन्मान करून त्यांना मोठे बळ देणारा आहे. १ लाख कोटींच्या योजनांचा समावेश असलेला हा क्रांतिकारी अर्थसंकल्प दुर्बल, गोरगरीब, शेतकरी आणि युवकांचे भविष्य उज्वल करणारा आहे. महाराष्ट्राला नवी दिशा देणाऱ्या निर्धाराचा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. हा महाराष्ट्राच्या विकासाचा गजर करणारा अर्थसंकल्प असल्याचेही त्यांनी सांगितले.



उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत २०२४- २५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला.फेब्रुवारीत वित्तमंत्र्यांनी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता.मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्यातील महिला, बेरोजगार युवक-युवती यांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी या अर्थसंकल्पात महत्त्वपूर्ण तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलीना व्यावसायिक शिक्षण मोफत, पात्र कुटुंबाला वर्षाला ३ सिलेंडर मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना,। पान ३ वर

## हा निवडणुकीचा नाही, तर निर्धाराचा अर्थसंकल्प; देवेंद्र फडणवीसांची प्रतिक्रिया

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा प्रगतिशील आणि 'सर्वजन हिताय सर्वजन सुखाय' असा असून सर्व समाजघटकांना दिलासा देणारा आहे. त्यांचा विचार करणारा आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच हा निवडणुकीचा नाही तर निर्धाराचा अर्थसंकल्प आहे, असं म्हणत त्यांनी एकप्रकारे विरोधकांच्या टीकेलाही प्रत्युत्तर दिलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळ परिसरात माध्यमांशी बोलताना यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. महाराष्ट्राचा अर्थसंकल्प हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गरीब कल्याणाचा विचार पुढे




नेणारा आहे. मी अजित पवार यांचे अभिनंदन करतो. महिला, युवा आणि शेतकऱ्यांना समर्पित असा हा आजचा अर्थसंकल्प आहे. सातत्यपूर्ण विकासाचा यात निर्धार आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.पुढे बोलताना त्यांनी अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेल्या विविध योजनांची माहितीही दिली. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून प्रतिमाह १५०० रुपये देण्यात येणार असून यासाठी ४६ हजार कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहेत. तसेच मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेच्या माध्यमातून वर्षाकाठी ३ सिलिंडर मोफत देण्यात येणार आहेत. याशिवाय मुलींना मोफत शिक्षण देण्याची योजना जाहीर करण्यात आली आहे.

## 'कुमार महाराष्ट्र केसरी' सूरज निकमने गळफास घेत आयुष्य संपवलं

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सांगली : सांगलीतला तरुण पैलवान सूरज निकमने त्याच्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. सूरज



निकम हा कुमार महाराष्ट्र केसरी पैलवान होता. त्याच्या आत्महत्येचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. पोलीस याबाबत तपास करत आहेत. कुस्तीच्या आखाड्यात अनेकांना चितपट करुन आस्मान दाखवणाऱ्या सूरजने अशा पद्धतीने आयुष्याचा शेवट केल्याने हळहळ व्यक्त होते आहे.


सूरज निकमचा दीड महिन्यापूर्वीच विवाह झाला होता. त्याच्या पश्र्चात त्याची आई, पत्नी आणि भाऊ असा परिवार आहे. शुक्रवारी संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास सूरजने गळफास घेतल्याचं त्याच्या नातेवाईकांना समजलं. त्याचे मामा भास्कर जोतीराम जाधव यांनी सूरजला रुग्णालयात आणलं होतं मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. कुस्ती क्षेत्रात उत्तम कामगिरी करणारा हा मल्ल काळाच्या पडद्याआड गेला आहे. गेल्या वर्षी झालेल्या कुमार महाराष्ट्र केसरी स्पर्धेत त्याने कुमार महाराष्ट्र केसरी स्पर्धा जिंकत मानाची गदा पटकवली । पान ३ वर

## सभागृहात खडाजंगी! हा संसदेच्या इतिहासातील काळा दिवस

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

१८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन चालू आहे. संसदीय अधिवेशनाचा आज (२८ जून) पाचवा दिवस असून माजी मंत्री तथा भाजपा खासदार अनुराग ठाकूर यांनी लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर चर्चेला सुरुवात केली, तर राज्यसभेत भाजपा खासदार सुधांशू त्रिवेदी यांनी आभार प्रस्तावावर बोलण्यास सुरुवात केली. दरम्यान, विरोधी पक्षांमधील खासदारांनी या चर्चेसह छएएढ पेपर लीक प्रकरणावरही चर्चा घेण्याची मागणी केली. यावरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या खासदारांमध्ये मोठा गोंधळ झाला. यामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज दोन वेळा तहकूब करण्यात आलं. दरम्यान, यावेळी राज्यसभेचे सभापती विरोधी पक्षांच्या खासदारांवर संतापल्याचं पाहायला मिळालं.

राज्यसभेत केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा बोलत असतानाच विरोधी पक्षांच्या खासदारांकडून घोषणाबाजी चालू होती. त्यानंतर सभापती जगदीप धनखड म्हणाले, आजचा




दिवस भरतीय संसदेच्या इतिहासातला काळा डाग बनला आहे. विरोधी पक्षांचे नेते स्वतः सभापतींच्या टेबलासमोरील जागेत (होदात) आले. असं सभागृहात यापूर्वी कधीच घडलं नव्हतं. हे पाहून मला खूप वेदना झाल्या आहेत. मला हे सगळं पाहून खूप आश्र्चर्य देखील वाटतंय. आपल्या संसदीय परंपरांचा, वरिष्ठ सभागृहातील सदस्यांच्या वागण्याचा स्तर इतका खाली कसा काय घसरू शकतो असा मला प्रश्र्न पडला आहे. त्यामुळेच सभागृहाचं कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब करत आहोत. सभापतींच्या टेबलासमोरी जागेत आलेल्या विरोधी पक्षांच्या खासदारांमध्ये काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभा सदस्य मल्लिकार्जुन खर्गे देखील होते. सभापतींना राज्यसभेचं कामकाज तहकूब केल्यानंतर प्रसारमाध्यमाच्या प्रतिनिधिंनी खर्गे यांना घडलेल्या घटनेबाबत विचारल्यावर त्यांना सभापतींनाच जबाबदार ठरवलं.

मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, ही सगळी राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांची चूक आहे. मी केवळ त्यांचं लक्ष वेधण्यासाठी आत गेलो होतो. पण ते दिसत नव्हते आणि तेही माझ्याकडे किंवा विरोधक काय म्हणतायत याकडे लक्ष देत नव्हते, ते आमच्याकडे पाहतही नव्हते. नियमानुसार त्यांनी माझ्याकडे पाहायला हवं. परंतु, त्यांनी जाणीवपूर्वक माझ्याकडे दुर्लक्ष करून । पान३ वर

## संपादकीय

### मतदाराने दाखवून दिले ..

निवडणुकीचे निकाल पाहिल्यानंतर कोणत्याही सुज्ञ नागरिकाच्या मुखातून 'थँक्यू मिस्टर व्होटर' हे शब्द निघाल्याशिवाय राहणार नाहीत, कारण या व्होटरने या देशाला हैती देश होण्यापासून वाचवले आहे. 'उत्तरी अटलांटिक महासागराच्या मध्ये, हिस्पानियोला द्वीपच्या पश्चिमी भागात हैती नावाचा देश आहे. तिथल्या पंतप्रधानांनी स्वतःला अवतार मानले आहे. अंधभक्तांची तिथेही कमी नाही. हैती आज रसातळाला गेलेला देश आहे!' मानवतेचे महत्त्व नाकारून परमेश्वराचा अवतार मानणाऱ्या नेत्याला मतदाराने ठिकाणावर आणून वैचारिक साम्य अजिबात नसलेल्या, ज्यांना जेलची हवा दाखवली त्या चंद्राबाबू नायडू आणि ज्यांच्या मित्रांच्या घरी इन्कमटॅक्सच्या धाडी टाकल्या त्या नितीशकुमार यांच्यासमोर केवळ सत्तेसाठी नाक घासत, 'अब हम भी मुजरा करेंगे' म्हणायला भाग पाडले. जिथे फुले वेचली तिथे गोवऱ्या वेचण्याची पाळी आणली. 'एक अकेला सब पर भारी, त्यालाही दिला दणका भारी','नफरत के बाजार में मोहब्बत की दुकान' हाच या देशाचा स्थायीभाव आहे हे दाखवून दिले. मतदाराने सत्तांतर घडवले नाही, पण लोकतंत्र मजबूत केले. अहंकारी, उन्मादी, धर्मांध नेत्यांना आत्ममंथन करण्यास बाध्य केले आहे. 'मोशा'ची खुमारी उतरविणाऱ्या, मोदींच्या अजय प्रतिमेचे वस्त्रहरण व मोदी युगाच्या अंताची सुरुवात करणाऱ्या, तसेच विरोधी पक्षांना संजीवनी देणाऱ्या व्होटरला आपण 'थँक्यू मिस्टर' म्हटलेच पाहिजे. या मतदाराने संविधान, लोकशाही आणि संघात्मक शासन पद्धतीला वाचवले आहे. अमेरिकेच्या 'न्यूयॉर्क टाइम्स'लासुध्दा म्हणावे लागले की मोदींची 'अजय' छबी संपली आहे. बीबीसीने म्हटले आहे, की काँग्रेससाठी ही निवडणूक आश्चर्यकारक पुनरुत्थानाचे प्रतीक आहे. द गार्डियन, वॉल स्ट्रीट जर्नल, चायना डेली आणि टाइम पत्रिकेने लिहिले आहे, की भारतात लोकतंत्र जिवंत असून या निवडणुकीने मोदी आणि भाजपला जबरदस्त झटका दिला आहे. जॉन हापकिन्स युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर देवेश कपूर यांनी म्हटले आहे, की मतदाराने स्वविवेकाने मतदान केले अन्यथा मोदींचा उधळलेला वारू थोपवणे कठीण होते. पराभवाची जबाबदारी स्वीकारून राजीनामा देण्याचे नैतिक धैर्य मोदींमध्ये नाही, आपल्याला जनतेने झिडकारले हा जनादेश स्वीकारायला मोदी तयार नाहीत. संघ किंवा भाजपच्या एकाही नेत्यांमध्ये मोदींना राजीनामा मागण्याची धमक नाही हे मतदार जाणून आहे. मतदाराने दाखवून दिले

पान १ वरुन

### राज्याचा ६ लाख १२ हजार

राज्य शासनाने अनेक निर्णय घेतले असून, स्वावलंबी शेतकरी, संपन्न शेतकरी हे ब्रीद जपत शेतकऱ्यांना विविध पातळीवर सहाय्य करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. बी-बियाणांसाठी थेट अनुदान, सिंचन सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेतीपूरक उद्योगांना प्रोत्साहन, शेतमालाचे मूल्यवर्धन, शेतमाल साठवणूक, बाजारपेठेची उपलब्धता इत्यादीबाबत विविध योजना राबविण्यात येत आहेत. नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत आजतागायत एकूण ९२ लाख ४३ हजार शेतकरी कुटुंबांना ५ हजार ३१८ कोटी ४७ लाख रुपये अनुदान देण्यात आले आहे. एक रुपयात पीक विमा योजने अंतर्गत ५९ लाख ५७ हजार शेतकऱ्यांना ३ हजार ५०४ कोटी ६६ लाख रुपये रक्कम अदा करण्यात आली आहे. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने अंतर्गत २ हजार ६९४ शेतकरी कुटुंबांना ५२ कोटी ८२ लाख रुपयांचे अनुदान वाटप करण्यात आले आहे. महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या १४ लाख ३३ हजार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम म्हणून ५ हजार १९० कोटी रुपये अदा करण्यात आले आहेत. यासाठी चालू अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद केली आहे, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

राज्यभरात पेट्रोल व डिझेलवरील मूल्यवर्धित कर समान करण्याची तरतूद; व्यवसाय कर, मुद्रांक शुल्काबाबतही दिलासादायक तरतूद

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सादर केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात पेट्रोल व डिझेल वरील मुल्यवर्धित कर राज्यभरात समान करण्याची तरतूद केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक तसेच उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा मिळणार आहे. या अर्थसंकल्पात पाच केंद्रीय सशस्त्र दलातील जवानांना व्यवसाय करातून सूट, मुद्रांक शुल्क दंडात कपात, मुद्रांक शुल्क परतावा आदी माध्यमातून नागरिकांना दिलासा देण्यात आला आहे.

पेट्रोल व डिझेलवरील मुल्यवर्धित कर राज्यभरात समान करण्याच्यादृष्टीने बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रातील डिझेलवरील सध्याचा कर २४ टक्क्यांवरुन २१ टक्के प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच पेट्रोलचा सध्याचा कर २६ टक्के अधिक प्रति लिटर पाच रुपये बारा पैसे वरुन २५ टक्के अधिक प्रति लिटर पाच रुपये बारा पैसे करण्याचे प्रस्तावित केले आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक तसेच उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा मिळणार आहे. या बदलामुळे ठाणे, बृहन्मुंबई आणि नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रातील पेट्रोलचा दर अंदाजे पासष्ट पैसे व डिझेलचा दर अंदाजे दोन रुपये सात पैसे प्रति लिटर स्वस्त होणार आहे.

उपमुख्यमंत्र्यांनी या अर्थसंकल्पात पाच केंद्रीय सशस्त्र दलातील जवानांना व्यवसाय करातून सुट दिली आहे. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातील आसाम रायफल्स, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, भारत-तिबेट सीमा पोलीस दल, राष्ट्रीय सुरक्षा रक्षक व सशस्त्र सीमा दल यातील राष्ट्रीय कर्तव्य बजावणाऱ्या सशस्त्र जवानांना व्यवसाय कर भरण्यापासून सूट दिली आहे. याचा लाभ अंदाजे १२ हजार जवानांना होईल.

नोंदणी झालेल्या दस्तास कमी मुद्रांक शुल्क भरल्याचे निष्पन्न झाल्यास, मुद्रांक शुल्काच्या फरकाच्या रक्कमेवर दस्त निष्पादित केल्याच्या तारखेपासून आकारण्यात येणारी दंडाची रक्कम दरमहा २% वरुन १% करण्यात येणार. तसेच मुद्रांक शुल्क परताव्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. यासाठी अर्ज करण्याची कालमर्यादा मुद्रांक खरेदी केल्यापासून सहा महिन्यांऐवजी एक वर्ष करण्यात आली आहे.

### उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित..

व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पातंर्गत १ हजार ५६१ कोटी ६४ लाख रुपये किमतीच्या ७६७ उपप्रकल्पांना । **पान २ वर**

मंजूरी- सुमारे ९ लाख शेतकऱ्यांना लाभ. * विदर्भ आणि मराठवाड्यातील १४ विपत्तीग्रस्त जिल्हयातील केशरी शिधापत्रिकाधारक ११ लाख ८५ हजार शेतकरी लाभार्थींना मे २०२४ अखेर ११३ कोटी ३६ लाख रुपये थेट रोख रक्कम अदा. * राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि राज्यपुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेतून गेल्या तीन वर्षात २ लाख १४ हजार शेती उपकरणांच्या खरेदीसाठी १ हजार २३९ कोटी रुपये अनुदान. * 'गाव तेथे गोदाम' या नवीन योजनेत पहिल्या टप्प्यात १०० नवीन गोदामांचे बांधकाम तसेच अस्तित्वातील गोदामांची दुरुस्ती. * कापूस, सोयाबीन तसेच अन्य तेलबियांच्या उत्पादकतेत वाढ आणि मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना-सन २०२४-२५ मध्ये ३४१ कोटी रुपये निधी. * आधारभूत किंमतीनुसार खरीप व रब्बी हंगामातील कडधान्य व तेलबियांच्या नाफेडमार्फत खरेदीसाठी १०० कोटी रुपयांचा फिरता निधी. * खरीप पणन हंगाम २०२३-२४ मध्ये कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी ५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य. * कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सन २०२३-२४ मध्ये ३५० रुपये प्रति क्विंटलप्रमाणे ८५१ कोटी ६६ लाख रुपये अनुदान. * कांदा आणि कापसाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी प्रत्येकी २०० कोटी रुपयांचा फिरता निधी. * खरीप पणन हंगाम २०२३-२४ मध्ये ६ लाख धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपयांप्रमाणे १ हजार ३५० कोटी रुपये प्रोत्साहन रक्कम प्रदान. * नोंदणीकृत २ लाख ९३ हजार दूध उत्पादकांना प्रतिलिटर ५ रुपयांप्रमाणे २२३ कोटी ८३ लाख रुपये अनुदान वितरीत ,राहिलेले अनुदानही त्वरित वितरीत करणार. * दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्याकरीता प्रतिलिटर पाच रुपयांप्रमाणे अनुदान देण्याची योजना जुलै, २०२४ पासून पुढे चालू ठेवण्यात येणार. * पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, पशुचारा आणि पशुखाद्य उत्पादन या क्षेत्रात नव उद्योजक निर्माण करण्याकरीता नवीन 'दुग्ध व्यवसाय उद्योजकता प्रकल्प'. * शेळी-मेंढीपालन आणि कुक्कुटपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी दोन नवीन प्रकल्प. * मत्स्यबाजार स्थापना तसेच मासळी विक्री सुविधांसाठी ५० कोटी रुपये निधी. * अटल बांबू समृद्धी योजनेतून १० हजार हेक्टर खाजगी क्षेत्रावर बांबूची लागवड -प्रतिरोपासाठी १७५ रूपये अनुदान . * राज्यातील पडीक जमीनीवर मोठया प्रमाणात बांबूची लागवड - नंदुरबार जिल्ह्यात १ लाख २० हजार एकर क्षेत्रावर बांबूची लागवड. * वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जिवीतहानी-नुकसान भरपाईच्या रकमेत २० लाख रुपयांवरून २५ लाख रुपये, कायमचे अपंगत्व आल्यास ५ लाख रुपयांवरून ७ लाख ५० हजार रुपये, गंभीर जखमी झाल्यास १ लाख २५ हजारावरून ५ लाख रुपये, किरकोळ जखमी झाल्यास २० हजार रुपयांवरून ५० हजार रुपये अशी वाढ , शेती पिकाच्या नुकसान भरपाईकरिता देय रकमेच्या कमाल मर्यादेतही २५ हजार रुपयांवरून ५० हजार रुपये वाढ. * सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम- १०८ प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता -दोन वर्षात ६१ प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित- सुमारे ३ लाख ६५ हजार हेक्टर सिंचन क्षमता. * महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम- १५५ प्रकल्पांच्या कालवे वितरण प्रणालीची सुधारणा येत्या तीन वर्षात त्यामुळे सुमारे ४ लाख २८ हजार हेक्टर वाढीव क्षेत्राला प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ. * विविध अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे, वितरण प्रणालीतील सुधारणांसाठी नाबार्डकडून १५ हजार कोटी रुपयांचे दीर्घ मुदतीचे अर्थसहाय्य. * म्हैसाळ जिल्हा सांगली येथे पथदर्शी सौर ऊर्जा प्रकल्प - अंदाजित किंमत एक हजार ५९४ कोटी रुपये- सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ७५ हजार शेतकरी कुटुंबांना लाभ.* स्वच्छ व हरित उर्जेचे ध्येय साध्य करण्यासाठी जनाई-शिरसाई, पुरंदर यासह सर्व शासकीय उपसा जलसिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण -४ हजार २०० कोटी रुपये खर्च.* वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प- नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ.* कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पूरामुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळावी आणि अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागात वळविण्यासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने तीन हजार २०० कोटी रुपये किंमतीचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम. * जलयुक्त शिवार अभियान-२ अंतर्गत मार्च २०२४ अखेर ४९ हजार ६५१ कामे पूर्ण - ६५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद. * 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेअंतर्गत एकूण ३३८ जलाशयातून ८३ लाख ३९ हजार ८१८ घनमीटर गाळ काढण्यात आला. ६ हजार शेतकऱ्यांना लाभ.* मागेल त्याला सौरउर्जा पंप- शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी सौर ऊर्जीकरण करण्याचा १५ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प -एकूण ८ लाख ५० हजार शेतकऱ्यांना सौरउर्जा पंप उपलब्ध करून देण्यात येणार.

युवा वर्गासाठी विविध योजना

* मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना- दरवर्षी १० लाख तरुण-तरुणींना प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण देण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना' - प्रति प्रशिक्षणार्थी दरमहा १० हजार रूपयांपर्यंत विद्यावेतन -दरवर्षी सुमारे ६ हजार कोटी रुपये खर्च. * शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी दरवर्षी ५० हजार युवकांना कार्यप्रशिक्षण. * जागतिक बँक सहाय्यित २ हजार ३०७ कोटी रुपये किमतीचा 'मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान. आणि कौशल्य विकास' - ५०० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ, मॉडेल आय.टी.आय, जागतिक कौशल्य केंद्र, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, डेटा सेंटर अशा विविध संस्थांचे बळकटीकरण. * मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, यवतमाळ, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, कराड जिल्हा सातारा, अवसरी खुर्द जिल्हा पुणे, येथील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये 'सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्यास मान्यता. * पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व नमो महारोजगार मेळाव्यातून सन २०२३-२४ मध्ये ९५ हजार ४७८ उमेदवारांची नोकरीसाठी निवड. * 'स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास प्रबोधिनी' मुंबईत गोवंडी येथे कार्यान्वित - ग्रामीण भागात ५११ 'प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रे' स्थापन - १५ ते ४५ वयोगटातील १८ हजार ९८० उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षण. * आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) इत्यादी संस्थांमार्फत एकूण २ लाख ५१ हजार ३९३ विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण- ५२ हजार ४०५ विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी प्राप्त. * संशोधन व नवउपक्रम केंद्रांसाठी विद्यापीठ व शासनाकडून प्रत्येकी ५० कोटी असा एकूण १०० कोटी रुपयांचा निधी. * शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत स्वयंरोजगार अर्थसहाय्याच्या योजनांसाठी १०० कोटी रुपये निधीची तरतूद. * अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांसाठीदेखील सन २०२४-२५ पासून विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना लागू. * इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेअंतर्गत दरवर्षी ३८ ते ६० हजार रुपयांपर्यंत निवासभत्ता. * गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार विकास महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींसाठी ८२ शासकीय वसतीगृहे स्थापन करण्यास मंजूरी. * राज्यात सध्या असलेले १ लाख लोकसंख्येमागे ८४ डॉक्टरचे प्रमाण सन २०३५ पर्यंत हे प्रमाण १०० हून अधिक करण्यासाठी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेची नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि ४३० खाटांची संलग्न रुग्णालये स्थापन करण्यास मान्यता. * मौजे सावर, तालुका म्हसळा, जिल्हा रायगड येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय युनानी महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता , बुलढाणा जिल्ह्यात नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय. * शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ निवासी डॉक्टर यांच्या विद्यावेतनात तसेच मानसेवी अध्यापकांच्या मानधनात भरीव वाढ. * थ्रस्ट सेक्टरमधे अंदाजे १ लाख कोटी रुपयांची गुतंवणुक- ५० हजार रोजगार निर्मिती. * हरित हायड्रोजन- २ लाख ११ हजार ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक- ५५ हजार ९०० रोजगार निर्मिती * महापे, नवी मुंबई येथे २५ एकर जागेवर 'इंडिया जेम्स न्ड ज्वेलरी पार्क' नियोजित- २ हजार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांचा समावेश-५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक - एक लाख रोजगार निर्मिती.

* एकात्मिक व शाश्र्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३ ते २०२८- पाच वर्षात २५ हजार कोटी रुपयांची भरीव गुंतवणूक-५ लाख रोजगार निर्मिती.* खासगी गुंतवणूक वाढविण्यासाठी लघु-वस्त्रोद्योग संकुले तसेच टेक्निकल टेक्सटाईल पार्क उभारण्यात येणार.* सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्कुबा डायव्हींग केंद्र- २० कोटी रुपये खर्च अपेक्षित - ८०० स्थानिकांना रोजगार.

**दुर्बल घटकांसाठी विविध योजना**

* 'सर्व स्वरुपातील सार्वत्रिक दारिद्र्य नाहीसे करणे' हे शाश्र्वत विकास ध्येय साध्य करण्याचा निश्र्चय. * संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतून निराधार, विधवा, दिव्यांग तसेच वृध्द नागरिकांच्या दरमहा अर्थसहाय्यात वाढ- एक हजारावरुन दीड हजार रुपये अशी वाढ - सन २०२३-२४ मध्ये ४५ लाख ६० हजार लाभार्थींना ७ हजार १४५ कोटी रुपये अनुदानाचे वाटप. * पान, पानपिंपरी आणि मुसळीचे उत्पादन करणाऱ्या बारी समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी संत श्री रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना. * नव्याने निर्माण करण्यात आलेल्या तसेच कार्यरत महामंडळांसाठी निधीची पुरेशी तरतूद. * दिव्यांग व्यक्तींसाठी 'धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजना' - पहिल्या टप्प्यात ३४ हजार ४०० घरकुल बांधणार. * दिव्यांग व्यक्तींना इलेक्ट्रीक वाहनाचे वाटप करणार. * तृतीयपंथी धोरण-२०२४ जाहीर-भरती प्रक्रियेमध्ये तसेच सर्व शासकीय योजनांमध्ये स्त्री-पुरुषांसोबतच 'तृतीयपंथी' हा लिंग पर्याय उपलब्ध-तृतीयपंथीयांना राज्य ासनाच्या योजनांचा लाभ घेणे सुलभ. * धनगर समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांसाठी खारघर, नवी मुंबई येथे ४ हजार चौरस मीटरचा भूखंड. * महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण महामंडळामार्फत नोंदणीकृत घरेलू कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना. * मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून राबवण्यात येणाऱ्या योजनांकरीता कर्जावरील शासन हमीची मर्यादा ३० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपये. * महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व कुटुंबांना लागू. * आरोग्य विमा संरक्षणाची रक्कम प्रतिकुटुंब १ लाख ५० हजार रुपयांवरून ५ लाख रुपये - एक हजार ९०० रुग्णालयांमार्फत एक हजार ३५६ प्रकारचे उपचार उपलब्ध.* 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' ३४७ ठिकाणी कार्यान्वित.* पतसंस्थांच्या स्थिरीकरण व तरलतेसाठी १०० कोटी रुपये निधी. * प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी, पारधी व आदिम आवास योजना, मोदी आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनांच्या माध्यमातून पुढील ५ वर्षात ३५ लाख ४० हजार ४९१ घरकुल बांधण्यात येणार.* सन २०२४-२५ मध्ये विविध घरकुल योजनांकरीता ७ हजार ४२५ कोटी रुपयांची तरतूद.* बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गिरणी कामगारांना १२ हजार ९५४ सदनिका वितरित-उर्वरित सदनिका उपलब्ध करुन देण्याचे नियोजन.* सन २०२४-२५ साठी स्वच्छ भारत अभियान ग्रामीणच्या दुसऱ्या टप्प्यासाठी १ हजार ८८६ कोटी ८४ लाख निधीची तरतूद.

**पायाभूत सुविधा आणि अन्य क्षेत्रातील महत्त्वाच्या योजना**

* मुंबई, पुणे व नागपूर शहरांमध्ये एकूण ४४९ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिका उभारण्यास मान्यता -१२७ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या. या वर्षात आणखी ३७ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या करण्यात येणार. * शिवडी-वरळी जोडरस्त्याचे काम डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण करण्यात येणार. * ठाणे किनारी मार्ग- लांबी १३.४५ किलोमीटर - ३ हजार ३६४ कोटी रुपये किमतीचे काम मे २०२८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित. * प्रधानमंत्री ग्रामसडक योजना- तिसऱ्या टप्पा-सुमारे ६ हजार ५०० किलोमीटर लांबीच्या रस्ते सुधारणांचे उद्दीष्ट -२ हजार ३०३ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे पूर्ण. * मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात २३ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे ३ वर्षात पूर्ण करण्यात येणार. * भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजनेसाठी १ हजार ४०० कोटी रुपयांची तरतूद. * संत सेवालाल महाराज जोडरस्ता योजना तसेच यशवंतराव होळकर जोडरस्ते योजनेची लवकरच अंमलबजावणी. * १९ महानगरपालिकांमध्ये पीएम ई-बस सेवा योजना राबविण्यात येणार. * 'ड' वर्ग महानगरपालिका, सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये अग्निशमन सेवांचा विस्तार आणि आधुनिकीकरणासाठी ६१५ कोटी रुपयांची योजनाराबविण्यात येणार. * धर्मादाय आयुक्तांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या मुंबई, नंदूरबार, नांदेड, वर्धा, अमरावती आणि कोल्हापूर येथील इमारतींच्या बांधकामासाठी तसेच अस्तित्वातील इमारतींच्या नूतनीकरणासाठी १२५ कोटी रुपयांचा निधी.* मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत २ हजार ५६७ ग्रामपंचायत कार्यालयांच्या बांधकामांना मान्यता देण्यात आली आहे. * जागतिक वारसा नामांकनासाठी शिवकालीन १२ किल्ल्यांचा युनेस्कोकडे प्रस्ताव पाठविला, कोकणातील कातळशिल्पे, पंढरपूर वारी, दहीहंडी उत्सव आणि गणेशोत्सव याबाबतचे प्रस्तावही पाठविण्यात येणार.* शासनाकडून रायगड किल्ल्यावर शिवराज्याभिषेक सोहळा दरवर्षी साजरा करणार. * वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग येथे ६६ कोटी रुपये अंदाजित किंमतीचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा पाणबुडी प्रकल्प. * सातारा जिल्ह्यातील पश्र्चिम घाट परिसरातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी ३८१ कोटी ५६ लाख रुपये किमतीचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा मंजूर. * कल्याण-नगर मार्गा माळशेज घाटात सर्व सोयींनीयुक्त अत्याधुनिक व्ह्युईंग गॅलरी उभारण्यात येणार. * नागपूर जिल्ह्यातील रामटेक विकास आराखड्याच्या दुसऱ्या टप्प्यात २११ कोटी रुपये किमतीची कामे हाती घेण्यात येणार. * अध्यात्मिक गुरु तथा समाजसुधारक महानत्यागी बाबा जुमदेवजी यांचे स्मारकासाठी पावडदौना, तालुका मौदा, जिल्हा नागपूर येथे विकास ७७ कोटीचा आराखडा तयार करणार. * संत ज्ञानेश्र्वर महाराजांनी ज्ञानेश्र्वरीची जिथे रचना केली त्या नेवासा येथील मंदिर परिसराचा विकास आराखडा तयार करणार. * कोल्हापूर शहरातील राजाराम तलावाकाठी अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारण्यात येणार. * बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथे बहुउद्देशिय सभागृह उभारण्याकरीता तसेच किसान शिक्षण प्रसारक मंडळ,बोरगाव-काळे तालुका जिल्हा लातूर या शैक्षणिक संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त आवश्यक निधी उपलब्ध करुन देणार. * छत्रपती संभाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या शिराळा, जिल्हा सांगली येथे त्यांचे स्मारक उभारणार. * संत श्री रुपलाल महाराजांचे समाधीस्थळ असलेल्या अंजनगाव सुर्जी, जिल्हा अमरावती येथे त्यांचे स्मारक उभारण्यात येणार. * आदिवासी कलांचे प्रदर्शन, वृद्धी आणि कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी हतगड तालुका सुरगाणा जिल्हा नाशिक येथे कलादालन स्थापन करण्यात येईल. * मुंबई येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या ३०५ कोटी रुपये किमतीच्या आराखड्यास मान्यता. * जिल्हास्तरावर संस्थात्मक क्षमता वाढवून विकासाला चालना देण्यासाठी 'महास्ट्राईड' हा २ हजार २३२ कोटी रुपये किमतीचा प्रकल्प जागतिक बँकेच्या सहाय्याने राबविण्यात येणार. * मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना- राज्यातील ४४ लाख ६ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्र्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णत: मोफत वीज पुरवली जाणार- १४ हजार ७६१ कोटी रुपये अनुदान देण्यात येणार. * राज्यातील सर्व योजनांचे लाभ पात्र लाभार्थींपर्यंत थेट पोहोचावेत यासाठी योजनांचे मूल्यमापन करुन त्यांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करणार.**एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी** * सन २०२४-२५ मध्ये जिल्हा वार्षिक योजना १८ हजार १६५ कोटी रुपयांचा नियतव्यय * वार्षिक योजना २०२४-२५ मध्ये कार्यक्रम खर्चासाठी एक लाख ९२ हजार कोटी रुपये * अनुसूचित जाती उपयोजनेकरीता १५ हजार ८९३ कोटी रुपये, आदिवासी विकास उपयोजनेकरीता १५ हजार ३६० कोटी रुपये नियतव्यय * सन २०२४-२५ मध्ये एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपयांची तरतूद * महसूली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये,महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी रुपये * महसूली तूट २० हजार ५१ कोटी रुपये, राजकोषीय तूट १ लाख १० हजार ३५५ कोटी रुपये

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358


This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# भारत सरकार तर्फे राष्ट्रीय सामाजिक कार्य पुरस्कार २०२४ ने ॲड.अजय वाघाळे सन्मानित

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

वागदरी/एस.के.गायकवाड : दिनाक २६/०६/२०२४ , नवी दिल्ली भारत सरकार तर्फे नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत व्यसान मुक्ती शेत्रात उलेखनियकार्य करणाऱ्या संस्था संघटनाचे पदाधिकारी यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन भरत सरकार तर्फे राष्ट्रीय पातळीवर दर वर्षी पुरस्कार देऊन सन्मानित करण्या येते... दिनाक २६ जुन हा दिवस अमली पदार्थ विरोधी दीन म्हणुन सर्वत्र साजरा केला जातो.. विवीध प्रकारच्या वेस उद. तंबाखू, गुटखा, दारू, गांजा, व अंधश्रध्दा निर्मुलन शेत्रात ग्राम पातळीवर काम करणाऱ्या धाराशिव जिल्यातील सहयोग सामाजिक संस्था

अध्यक्ष ॲड अजय शिवाजी वाघाळे यांना आयुष मंत्रालय नवी दिल्ली, नशा मुक्त भारत अभियानात भाग घेऊन वेसण मुक्ती शेत्राता उलेखनी य कार्य केल्याबद्दल सन्मान पत्र, स्मृती चिन्ह मान्यवरांच्या हस्ते देऊन नवी दिल्ली येथे गुर्वण्यत आले... या प्रसंगी केंद्रीय मंत्री रामदास आठवले, एच ए बसेम फ हेल्थ कोंसिलर health Counselor ,-mbassy of the state palestin



आरोग्य सल्लागार, राज्य पॅलेस्टाईन दूतावास, कौशल किशोर गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार राज्यमंत्री आणि लोकसभा सदस्य भारत सरकार,डॉ, रोशन भाड प्रोफेसर मानसोपचार एनडीटीसी एम्स नवी दिल्ली,डॉ ओमप्रकाश शेटे अध्यक्ष औषमान भारत योजना,अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या संचालिका प्राध्यापक तनुजा नर्सारी,समाधान फाऊंडेशनचे अध्यक्ष रवी के भार्गव,ओमराजे निंबाळकर भारत सरकार नवी दिल्लीचे माननीय सदस्य,राजा भाई वाजे सदस्य संसद भारत सरकार ,नवी दिल्ली ,डॉ संदीप तांबारे आयुष इन्स्टिटच्यूट जुही सबरवाल नशा मुक्त भारत अभियान, या मान्यवरांच्या उपस्थितीत भारत सरकार तर्फे राष्ट्रीय सामाजिक कार्य पुरस्कार २०२४ ॲड अजय वाघाळे यांना गौरविण्यात आले..

. पुरस्कार मिळाल्याबद्दल आयुष फाऊंडेशन, येडाई व्यासन मुक्ती केन्द्र, अंधश्रध्दा निर्मुलन समिति, राष्ट्र सेवादल च्यावतीने अभिनंदन करण्यात आले...र

# रिंकू जाधवर धसच्या वतीने दहा मुलींना वर्षभराच्या शैक्षणिक साहित्याचे वाटप



**शिक्षिकेने शैक्षणिक कामात उत्तम असून गरजू मुलांना शैक्षणिक मदत करत,त्यांनी सामाजिक बांधिलकी देखील जपली आहे.त्यांचा आदर्श सर्व कर्मचाऱ्यांनी घेण्यासारखा आहे.–प्रशांत अरबाळे –गटशिक्षणाधिकारी पं.स. अक्कलकोट**

हा उपक्रम मी स्वयंप्रेरणेने सामाजिक तळमळीतून माझी स्वतःची आर्थिक बचत करून स्वखर्चाने राबवीत आहे मुलींचा स्वाभिमान जागा करून स्वावलंबी व सक्षम बनविण्यासोबतच मुलींचा स्वतःचा विकास त्यासोबतच कुटुंबाचा समाजाचा व पर्यायाने देशाच्या विकासात मुलींचा सहभाग वाढविणे व समाजासमोर मुलींच्या शिक्षणाचा एक आदर्श निर्माण करण्याचा मुलींना शिक्षणाची प्रेरणा देण्याचा प्रयत्न या नाविन्यपूर्ण उपक्रमातून मझा आहे या उपक्रमासाठी मी दहा मुलींची निवड केलेली आहे. **– रिंकू जाधवर धस–शिक्षिका, उमरगे अक्कलकोट**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी:प्रयोगशील आदर्श उपक्रमशील शिक्षिका श्रीमती रिंकू जाधवर धस यांनी मुलींच्या स्वाभिमानी स्वावलंबी शैक्षणिक सक्षमीकरणासाठी जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या अत्यंत हुशार व गरजू अशा दहा मुलींना पालकत्व घेऊन इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी घेतल्या आहे.या यंदाही त्या मुलांना वर्षभराच्या दप्तरासह संपूर्ण शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.पालकत्वाची संकल्पना घेणाऱ्या उपक्रमशील शिक्षिका रिंकू जाधवर (धस ) यांचा सर्वत्र कौतुक होत आहे.

गेल्या सहा वर्षांपासून शैक्षणिक पालकत्व या उपक्रमाची त्यांनी सुरुवात केलेली आहे.दहा मुलींची निवड करून वर्षभराच्या दप्तरासह संपूर्ण शैक्षणिक साहित्याचे वाटप त्या करतात.वर्षभरात विद्यार्थिनींच्या गरजेनुसार व आवश्यकतेनुसार संपूर्ण शैक्षणिक साहित्य त्या स्वखर्चाने पुरवतात.या नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे मुलींचे शिक्षण अर्धवट न राहता त्या स्वावलंबी व सक्षम बनतील एक मुलगी शिकली म्हणजे दोन कुटुंब पर्यायाने समाज व देश घडवण्यात मुलींचा सहभाग वाढेल मुलींचे सक्षमीकरण करण्यास त्यांना स्वावलंबी बनवण्यास त्यांचा हा उपक्रम अतिशय महत्त्वपूर्ण व नाविन्यपूर्ण असून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे .

हा उपक्रम स्वयंप्रेरणेने सामाजिक तळमळीतून स्वतःची आर्थिक बचत करून स्वखर्चाने राबवीत आहे मुलींचा स्वाभिमान जागा करून स्वावलंबी व सक्षम बनविण्यासोबतच मुलींचा स्वतःचा विकास त्यासोबतच कुटुंबाचा समाजाचा व पर्यायाने देशाच्या विकासात मुलींचा सहभाग वाढविणे व समाजासमोर मुलींच्या शिक्षणाचा एक आदर्श निर्माण करण्याचा, मुलींना शिक्षणाची प्रेरणा देण्याचे प्रयत्न या नाविन्यपूर्ण उपक्रमातून दिसुन येत आहे.या उपक्रमासाठी दहा मुलींची निवड केलेली आहे त्यांना वर्षभराचे दप्तरासह संपूर्ण शैक्षणिक साहित्य स्वखर्चाने पूरविते जाते.यासोबतच मुलाच्या वाढदिवसानिमित्त गेल्या बारा वर्षांपासून शाळेतील पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना दप्तरासह संपूर्ण शैक्षणिक साहित्याचे वाटप देखील स्वखर्चाने केली आहे.

# पुरंदर तालुका कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना मार्गदर्शन

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषी संजीवनी पंधरावडा निमित्त बैठक

**पुरंदर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी संजीवनी पंधरावडा अंतर्गत महिला सन्मान दिनानिमित्त बोपगांव ता. पुरंदर ज़ि. पुणे येथे गाव बैठक कार्यक्रम घेण्यात आला. सदर बैठकीमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, प्रधानमंत्री अन्नप्रक्रिया उद्योग योजना , स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, कृषी विभागामार्फत महाडीबीटी पोर्टलवर राबवल्या जाणाऱ्या ऑनलाईन योजना , महिलांना शेतकरी बचतगट 'आत्मा' अंतर्गत स्थापन करणे बाबत मार्गदर्शन, आपत्कालीन पीक व्यवस्थापन, पी एम किसान सन्मान निधी योजना अशा सर्व योजनांबाबत तालुका कृषी अधिकारी पुरंदर व




मंडळ कृषी अधिकारी सासवड यांचे मार्गदर्शनाखाली बोपगाव गावचे कृषी सहाय्यक श्री जाधव व्ही.सी यांनी मार्गदर्शन केले. सदर प्रसंगी बोपगाव ग्रामपंचायत मधील सरपंच,सदस्य तथा लोकप्रतिनिधी ,शेतकरी यांचे मार्फत पी एम किसान योजनेमध्ये कृषी विभागामार्फत समाधानकारक काम झाल्याचे बैठकीमध्ये सांगितले. तसेच फेब्रुवारी २०१९ नंतरच्या शेतकऱ्यांना नियम व अटीमुळे प्रलंबित राहिलेल्या शेतकऱ्यांना पीएम किसानचा लाभ मिळणे बाबत विनंती केली. सदर बैठक प्रसंगी बोपगाव गावचे सरपंच व ग्रामपंचायत सदस्य व इतर ग्रामस्थ शेतकरी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथील उपहारगृह मंदिर समिती मार्फत सुरू : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी: श्री.विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणा–या भाविकांना निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पंढरपूर शहरात भक्ती मार्गावर सुसज्ज अशा श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवासाची उभारणी करण्यात आली आहे. या भक्तनिवासामध्ये उपहारगृहाची देखील निर्मिती करण्यात आली आहे. सदरचे उपहारगृह चालविण्यास देणेकामी ई लिलाव राबविण्यात आला होता. तथापि, सदर ई लिलावातील सर्व लिलावधारकांनी माघार घेतल्याने, सदरचे उपहारगृह मंदिर समिती मार्फत प्रायोगित तत्वावर चालविण्याचा निर्णय मंदिर समितीने घेतला होता. त्यानुसार आज शुक्रवार दिनांक २८ जून पासून मंदिर समिती मार्फत उपहारगृह सुरू करण्यात आले असून भाविकांना माफक दरात उत्तम भोजन मिळणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी



दिली.सदर उपहारगृहाचे उद्घाटन कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, विभाग प्रमुख बलभिम पावले, सहायक विभाग प्रमुख धनंजय कोकीळ व सावता हजारे उपस्थित होते. या उपहारगृहामध्ये चहा, नाष्टा व भोजन माफक दरात उपलब्ध करून देण्यात येत आहे.

पान १ वरुन

## महाराष्ट्राला नवी दिशा देणारा निर्धाराचा

शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी १५ हजार कोटींचा प्रकल्प, शेतीपंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांना संपूर्ण वीज माफी देणारी मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम, शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी दरवर्षी ५० हजार युवकांना कार्यप्रशिक्षण, एकूणच दुर्बल घटकाचे दारिद्र्य नाहीसे करण्यासाठी केलेला निश्र्चय यामुळे हा अर्थसंकल्प वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. विशेषत: महिलांना शासनामार्फत दरमहा दीड हजार रुपये तसेच अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय तसेच कृषि विषयक सर्व व्यावसायिक पदवी–पदविका अभ्यासक्रमांसाठी मुलींना मोफत शिक्षण यामुळे राज्य शासनाने महिलांप्रती बांधिलकी व्यक्त केली आहे.

## 'कुमार महाराष्ट्र केसरी'

होती. पैलवान सूरज निकम हा सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातल्या नागेवाडी गावातील रहिवासी आहे. त्याने कुस्तीच्या आखाड्यात भीम पराक्रम केला आहे. कुमार महाराष्ट्र केसरी हा किताबही त्याने जिंकला. विरोधी पैलवानाला कोणत्या डावावर चितपट करायचे यात त्याचा हातखंडा होता. त्याने अल्पावधीतच आपला कुस्ती क्षेत्रात दबदबा निर्माण करत कुमार केसरी होण्याचा बहुमान मिळवलेला होता. या सूरजने आत्महत्या का केली? याचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. या घटनेमुळे कुस्ती क्षेत्रासह खानापूर तालुक्यात शोककळा पसरली आहे.

## सभागृहात खडाजंगी!..

माझा अपमान केला. मग माझ्याकडे कोणताच पर्याय उरला नव्हता. त्यांचं लक्ष वेधण्यासाठी माझ्याकडे एकतर आत जाण्याचा पर्याय होता किंवा खूप जोरात ओरडावं लागणार होतं. काँग्रेस अध्यक्ष म्हणाले, देशात मोठमोठे घोटाळे झाले आहेत, छएएढ परीक्षा झाली, मात्र त्या परीक्षेच्या प्रश्र्नपत्रिका फुटल्याचं उघडकीस आलं आहे. त्यामुळे लाखो मुलं त्रस्त आहेत. हा एक गंभीर विषय असून यावर सभागृहात चर्चा व्हावी असं आम्हाला वाटतं. आम्ही चर्चेची मागणी देखील केली. मात्र सभापतींनी आम्हाला संधी दिली नाही. आमच्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष केलं गेलं. त्यामुळे आम्हाला सभापतींचं लक्ष वेधण्यासाठी आमची जागा सोडून सभापतींच्या टेबलीसमोर जाऊन उभं राहावं लागलं.

# अशोक जगदाळे यांना विधान भवनात पाठविण्याचा महा विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांचा निर्धार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :तुळजापूर तालुक्यातील शेतकरी ऊस व दूध उत्पादक मजूर शेतमजूर सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्र्नावर चौकशी करून गावोगावी संवाद करीत तुळजापूर मतदार संघांमध्ये जे जे कामे रखडलेली आहेत असे सर्व कामे मार्गी लावणार असा निर्धार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राज्य कार्यकारणी सदस्य तथा दृष्टी समूहाचे उद्योजक अशोक जगदाळे यांनी व्यक्त केले नळदुर्ग येथे नळदुर्ग शहराचे सुपुत्र राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते अशोक जगदाळे यांच्या वाढदिवसानिमित्त नळदुर्ग येथे बी .के . फंक्शन हॉलमध्ये शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आलेला होता त्यावेळेस ते सत्काराला उत्तर देताना बोलत होते .

ते पुढे म्हणाले तुळजापूर मतदार संघांमध्ये अनेक कामे प्रलंबित असलेले दिसून आले मी प्रत्येक गावात प्रत्येक वस्तीत जाऊन प्रत्येक नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्या आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या ,अनेक गावातील आजी माजी सरपंच ग्रामपंचायत सदस्य , काही आजी माजी पं स सदस्यां सह महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी यांच्या माध्यमातून अनेक नागरीकांच्या समस्य सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आसल्याचे मत अशोक जगदाळे यांनी व्यक्त केले जे ही कामे करावयाची आहेत ते काम महाविकास आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांना एकत्रितपणे येऊन जे प्रलंबित कामे आहेत ते कामे पूर्ण करणार आहोत आसे परखड मत ही अशोक जगदाळे यांनी व्यक्त केले .



नळदुर्ग येथे नुकताच शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळेस ते बोलत होते .या कार्यक्रमास अणदूर येथील सरपंच रामचंद्र आलुरे, शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख कमलाकर चव्हाण, माजी नगराध्यक्ष शहबाज काझी, माजी नगराध्यक्ष मुस्ताक कुरेशी, माजी नगरसेवक इमाम शेख, माजी नगराध्यक्ष नितीन कासार, माजी नगर सेवक महालिंग स्वामी, माजी नगर सेवक अमृत पुदाले, माजी नगरसेवक विनायक अंहकारी, सोसायटीचे माजी चेअरमन दत्तात्रय कोरे .,संजय जाधव, मुनीर शेख, मुकुंद नाईक, नवलकुमार जाधव , अमित शेंडगे शिवसेना शहर प्रमुख संतोष पुदाले, राष्ट्रवादीचे शहर प्रमुख महेबूब शेख, लहुजी शक्ती सेनेचे शिवाजी गायकवाड, जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य शिवाजीराव मोरे, बंकट बेडगे , सत्यवान सुरवसे, काग्रेसचे शहराध्यक्ष नवाज काझी, सरदारसिंग ठाकूर, गोविंद देवकर, होर्टीचे माजी सरपंच ज्ञानेश्र्वर भोसले, कृष्णात मोरे, , डॉ बालाजी जाधव, विलास पुदाले, कनगऱ्याचे सरपंच मधुकर गंगणे, उपसरपंच सुरज इंगळे, युवराज पिंपळे , माजी .सरपंच अमोल मस्के काटीचे सरपंच सुजित हंगरगेकर , काटगावचे दीपक माळी, शेतकरी संघटनेचे अरविंद घोडके, मंगरूळ गावचे डोंगरे महाविकास आघाडीचे भरगच्च कार्यकर्ते या शेतकरी मेळाव्यास व दृष्टीसमूहाचे उद्योजक अशोक जगदाळे यांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते

तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी अशोक जगदाळे यांना विधानभवनात पाठवण्यासाठी कंबर कसली आहे .विधान भवनात पाठवण्याचा निर्धार केला आहे .नळदुर्ग शहराचे सुपुत्र दृष्टीसमूहाचे उद्योजक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे कार्यकारणी सदस्य अशोक जगदाळे यांना विधानभवनात पाठवण्याची वज्रमुठ बांधली आहेर

# प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशासाठीच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रियेला मुदतवाढ

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

'गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित डिप्लोमा इंजिनिअरिंग मध्ये प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी फॅसिलिटेशन सेंटर (एफ.सी.) क्र.– ६४३७ ला मान्यता मिळाली असून प्रथम वर्ष डिप्लोमा प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याच्या प्रक्रियेला आता मुदतवाढ मिळाली आहे. बुधवार दि. २९ मे, २०२४ पासून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, कागदपत्रे पडताळणी व अर्ज निश्र्चिती आदी प्रक्रिया सुरू झाली होती आणि मंगळवार दि. २५ जून २०२४ ला संपणार होती पण दरम्यानच्या कालावधीत अनेक विद्यार्थांना प्रशासनाकडून कागदपत्रे व प्रमाणपत्रे उपलब्ध झाली नाहीत. ही बाब लक्षात आल्यामुळे आता या प्रक्रियेला मुदतवाढ मिळाली असून विद्यार्थ्यांना आता दि. ०९ जुलै, २०२४ पर्यंत रजिस्ट्रेशन करता येणार आहे. आता विद्यार्थांना रजिस्ट्रेशन करण्यासाठी फक्त त्यांचा दहावी परीक्षेचा आसन क्रमांक टाकून प्रवेश अर्ज भरता येणार आहे.' अशी माहिती डिप्लोमा प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ यांनी दिली.दरम्यान या कालावधीत प्रमाणपत्रांची पडताळणी, छाननी व नोंदणी आदी प्रक्रियेनंतर मुख्य कॅप राऊंडसाठी ऑप्शन फॉर्म भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया चालू होणार आहे. डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी प्रा.एस.एस.गायकवाड (मोबा.क्र.- ९८९०५६६२८१) व प्रा.एम.एम.मोरे (मोबा.क्र. - ९४२१९६०२५८) यावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली उच्चशिक्षित प्राध्यापकांच्या सहकार्याने सर्वोत्कृष्ट निकाल, आदर युक्त शिस्त आणि करिअरच्या दृष्टीने सर्वोत्तम संस्कार देण्याची परंपरा कायम राखल्यामुळे स्वेरीच्या 'पंढरपूर पॅटर्न' चा दबदबा कायम आहे. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे ५ अभ्यासक्रमांना मिळालेले एनबीए मानांकन, महाराष्ट्र व गोवा राज्यातील बेस्ट पॉलिटेक्निक कॅम्पस अवॉर्ड, गेली सलग सहा वर्षे शंभर टक्के ॲडमिशन होणारे महाराष्ट्रातील बहुधा एकमेव खाजगी महाविद्यालय आहे. त्यामुळे विद्यार्थी व पालकांच्या पसंतीस उतरलेले स्वेरी अभियांत्रिकी हे राज्यात 'ब्रँड' बनले आहे. सन २०२४–२५ करीता प्रवेशासाठी स्वेरी संचलित डिप्लोमा इंजिनिअरिंग फॅसिलिटेशन सेंटरमध्ये सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे दिसून येत आहे.

# राष्ट्रीय आयोगाची जुनी आकडेवारी योग्य तर राज्य आयोगाचा डाटा अयोग्य कसा ?

## मराठा आरक्षण सुनावणीवर अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांचा सवाल

**मुंबई :दैनिक यशसिध्दि न्यूज** मराठा समाज हा राष्ट्रीय जीवनातील मुख्य प्रवाहापासून नेहमीच दूर राहिल्याचा दावा करून त्यांना आरक्षण दिले गेले आहे. परंतु नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकांत राज्या तील ४८ पैकी २६खासदार हे मराठा समाजाचे असल्याची बाब आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिका कर्त्यांनी गुरुवारी दि २७ जुन रोजी न्यायालयाच्या निदर्शनास आणली असून विरोधक सगळाच मराठा समाज उन्नत प्रगत असल्याचे उच्च न्यायलया समोर अयोग्य चित्र निर्माण करत असुन या प्रकरणातील मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ते जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे की, राष्ट्रीय आयोगाची जुनी आकडे वारी योग्य असेल तर राज्य आयोगाचा डाटा अयोग्य कसा ? याचिकाकर्ते यांचे वकील जेष्ठ विधिज्ञ प्रदीप संचेती सुनावणी दरम्यान म्हणाले कि, हा समाज मागास व राष्ट्रीय जीवनातील मुख्य प्रवाहापासून दूर कसा ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.यावरून राजकीय पुढारले पणाचा आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक मागासले पणाशी संबंध नाही. या सगळ्या वेगळ्या बाबी आहेत, अशी टिप्पणी मुंबई उच्च न्यायालयाने केली. मराठा समाजाला शैक्षणिक आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षण देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या आणि आरक्षणाच्या समर्थनार्थ करण्यात आलेल्या हस्तक्षेप याचिकांवर मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय, न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणिन्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या पीठसमोर सुनावणी सुरू आहे.

याप्रकरणी बुधवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी याचिका कर्त्यातर्फे वरिष्ठ वकील प्रदीप संचेती यांनी राज्यातील नवनिर्वाचित मराठा खासदार संख्येचा आणि त्यानंतरही या समाजाला मागासलेला म्हटले जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर न्यायालयाने टिप्पणी केली.

मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास ठरवून १० टक्के आरक्षणाची शिफारस करणाऱ्या निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षते खालील राज्य मागास वर्ग आयोगाच्या कार्यपद्धतीवर आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिका कर्त्यां कडून प्रश्न उपस्थित करण्यात आला. तसेच, सादर केलेली आकडेवारी दिशाभूल करणारी असल्याचा दावा केला.

सरकार आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडूच शकत नाही – विधीज्ञ प्रदीप संचेती यांचा दावा

मुंबई उच्च न्यायालयात न्यायमुर्ती सुनील शुक्रे आयोगाच्या अहवालावर याचिकाकर्त्यांचा आक्षेप आहे.१९९१मध्ये भारताने स्वीकारलेल्या आर्थिक उदारीकरणाच्या धोरणा नंतर मराठा समाजाचे दारिद्र्य रेषे खालील प्रमाण कमी होण्या ऐवजी वाढले कसे ? असा सवाल गुरुवारी उच्च न्यायालयात याचिकाकर्त्यांनी उपस्थित केला आणि सुनिल शुक्रे आयोगाच्या अहवालावर आक्षेप घेतला. न्यायालयाने उर्वरित युक्तिवादा साठी पुढील आठवड्यात दोन दिवस सलग सुनावणी निश्चित केली.सरकारने लोकसभा निवडणूक डोळ्या समोर ठेवून मराठा समाजाला दिलेले आरक्षण घटनाबाह्य आहे, असा दावा करीत विविध जनहित याचिका उच्च न्याया लयात दाखल झाल्या आहेत. या याचिकांवर न्यायपीठा पुढे सुनावणी झाली.यावेळी याचिका कर्ते संजित शुक्ला यांच्यातर्फे ज्येष्ठ वकील प्रदीप संचेती यांनी युक्तिवाद केला,तर सीमा मंधानिया यांच्या तर्फे विधीज्ञ आश्विन देशपांडे, विधीज्ञ निहार चित्रे यांनी बाजू मांडली तर मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ते राजेंद्र दाते पाटील यांचे वतीने विधीज्ञ मधुर गोलेगावकर आणि विधीज्ञ श्रेयश देशपांडे आदीकामकाज पहात आहेत. जेष्ठ विधीज्ञ प्रदीप संचेती यांनी इंद्रा सहानी,एम.नागराज व जयश्री पाटील प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने नोंदवलेल्या निरीक्षणांकडे लक्ष वेधले. आता या न्यायपीठाने उर्वरित युक्तिवाद ऐकून घेण्यासाठी पुढील आठवड्यात सोमवार व मंगळवारी सलग सुनावणी निश्चित केली.

आरक्षणाची मर्यादा ५० टक्केच प्रमाण मानायची का ?

असा अत्यंत महत्वाचा सवाल उच्च न्यायालयाने २७ जूनच्या मराठा आरक्षणाच्या राज्य सरकारच्या कायद्याला आव्हान देणाऱ्या यांचिकांच्या सुनावणी वेळी करतांना एखाद्या समाजाचे सरकारी नोकरी मध्ये पुरेसे प्रतिनिधत्व नाही असे जर का राज्य शासनाला वाटल्यास अपवादात्मक परिस्थिती असल्याचे सिद्ध केल्यानंतर आरक्षण मर्यादा वाढविण्याची तरतूद कायद्यात असल्याचेही न्यायालयाने यावेळी नमुद केले.याचिका कर्त्यांच्या वकिलांनी राज्य सरकारचा निर्णय कसा अयोग्य आहे हे सतत पटवून देण्याचा प्रयत्न केला. सरकारने संपूर्ण माहिती संकलित केली तरी आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांहून अधिक करणे अशक्य आहे,असे याचिका कर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले.मराठा आरक्षण विरोधी याचिकांवर सुनावणी मराठा समाजाला सरकारी नोकरी आणि शिक्षण क्षेत्रात आरक्षण देण्यासाठी सरकारने केलेल्या नव्या कायद्याला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका उच्च न्यायालयात दाखल आहेत.

## बँकरुपी लावलेले रोपटे तोडणाऱ्यांची संख्या जास्त : ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः एखादा व्यक्ती समोर लहानसे रोपटे लावण्याचा प्रयत्न करतो कारण लहानशा रोपट्याची मोठ्या वृक्षांमध्ये रूपांतर होऊन या झाडाखाली थांबणाऱ्याला सावली लागणार असतील त्याचप्रमाणे फुले फळे लागणार असतील परंतु आमच्या लहानशा रोपट्याला तोडण्याची काम काही विघ्न संतोषी लोक करीत असतात तसेच सध्याच्या जगामध्ये सर्वत्र स्पर्धा वाढलेले आहेत बँकिंग क्षेत्रामध्ये देखील स्पर्धा या वाढलेल्या असून अशा या बँक रुपीस रोपट्याला तोडण्याचे काम काही मंडळी करीत असतात परंतु त्या लहानशा रोपट्यांची झोपलो करून त्याला वाढवण्याचे प्रयत्न काही लोक करतात आणि ते झाड मोठी होऊन सर्वांना सावली देऊ लागते या बँक रुपये रोपट्याला मोठ्या झाडांमध्ये रूपांतर करण्याचे कार्य आधी माझी संचालक मंडळांनी केलेले आहे त्याचप्रमाणे कर्मचारी यांना देखील येथे केले जाते अशा प्रकारच्या उदाहरणापासून ह भ प घेण्यात महाराज औसेकर दि पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक या बँकेच्या सातव्या नवीन शाखेचे उद्घाटन इसबाव येथे करीत असताना या प्रसंगी आपली मनोगत व्यक्त केली पंढरपूर मर्चंट बँकेची १९६१ सालच्या स्थापनेपासून ते आतापर्यंतच्या सर्व संचालक मंडळांनी पंढरपूर मर्चंट बँकेच्या प्रगतीस व वाढीस हातभार लावलेला आहे दि पंढरपूर मर्चंट कॉपरेटिव्ह बँक शहरातील व्यापारी शेतकरी कष्टकरी शिक्षक लघु उद्योजक करणारे उद्योजक यांना आर्थिक मदत करण्याचा उद्देशाने व लोकांचे आर्थिक परिस्थिती बळकट करण्याच्या उद्देशाने बँक कार्यरत आहे १९००० च्या संख्येने असलेले सभासद ठेविदार यांच्या विश्वासात पात्र ठरलेली ही बँक आहे माझी चेअरमन नागेश काका भोसले आणि बँकेला प्रगती पथावर आणण्याचेमर्चंट बँकेचे संचालक मंडळ कर्मचारी हे सभासदांच्या व बँकेच्या ग्राहकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असतात पंढरपूर मर्चंट बँकेची शाखा या संपूर्ण जिल्ह्यामध्ये व्हावेत व जिल्ह्याच्या बाहेर देखील पंढरपूर मध्ये बँकेच्या शाखा व्हाव्यात अशी शुभेच्छा महाराजांनी आज इसबावी येथील नवीन शाखेच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केली

## श्रद्धा इन्स्टिट्यूटच्यावतीने मोफत वर्कशॉप

**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

श्रद्धा इन्स्टिट्यूट तर्फे अबॅकस आणि वैदिक गणिताचे मोफत वर्कशॉप आयोजित करण्यात आले आहे. रविवार, ३० जून २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजता जाजू कॉम्प्लेक्स,ए.वन.चौक, अक्कलकोट येथे हा वर्कशॉप होणार आहे.

या वर्कशॉप मध्ये अबॅकस आणि वैदिक गणिताच्या विविध तंत्रांचा उपयोग करून गणिताच्या सोप्या व जलद पद्धती शिकवण्यात येतील. स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी इच्छुक असणार्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. वर्कशॉप सर्वांसाठी खुला आहे आणि मोफत आहे. अबॅकस आणि वैदिक गणिताच्या प्रशिक्षणामुळे तुम्हाला अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात:तुम्ही घरीच अबॅकस आणि वैदिक गणिताचे वर्ग सुरू करू शकता.तुम्ही एक प्रशिक्षण केंद्र उघडू शकता.वैदिक गणिताचे घरगुती शिक्षण घेण्याची संधी मिळवू शकता.नोकरी म्हणून, तुम्ही शाळेत अबॅकस आणि वैदिक गणित शिक्षक म्हणून सहभागी होऊ शकता किंवा तुमच्या विद्यमान कोचिंग केंद्रात सामील होऊ शकता.दीर्घकाळ नियमित उत्पन्नाचे स्रोत.जलद वाढ दर.कमी गुंतवणूक, श्रम आणि प्रयत्नांसह व्यवसाय.प्रतिष्ठित आणि परिपूर्ण व्यवसाय.तारीख : ३०/०६/२४ वेळ : सकाळी ११ ते दुपारी २ ठिकाण: जाजू कॉम्प्लेक्स,ए.वन.चौक, अक्कलकोट अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी संपर्क साधा: फोन: ८४४६८८९६६ / ९१६८७१६०६०

ई-मेल: infoshraddhainstitute.in

Website:- www.shraddhainstitute.in

स्वतःचे व्यवसाय सुरु करून आत्मनिर्भर होण्यासाठी श्रद्धा इन्स्टिट्यूट आपल्याला या वर्कशॉपला उपस्थित राहण्याचे आवाहन करत आहे अशी माहिती श्रद्धा इन्स्टिट्यूट ची संचालिका स्वाती शहा यांनी पत्रकारांना दिलेली आहे.

## सामाजिक न्यायाचे प्रणेते छत्रपती शाहू महाराज होय : ॲड.प्रज्ञेश चैतन्य सोनावणे



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

भिवंडी/मिलिंद जाधव :महामानवांचा विचारांचा रथ पुढे नेण्यासाठी, वारसा जपण्यासाठी, त्यांच्या महान कार्यावर प्रकाश टाकण्यासाठी वंचित बहुजन आघाडी भिवंडी शहर कमेटी यांच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती छत्रपती शिवाजी महाराज चौक, शिवसेना भवन हॉल, भिवंडी येथे साजरी करण्यात आली. महात्मा जोतीराव फुले आणि महामानव बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना जोडणारा दुवा म्हणजेच छत्रपती राजर्षी शाहू महाराज होय. केवळ आरक्षणच नव्हे तर कला, क्रीडा, संगीत, नाटक इत्यादी क्षेत्रात छत्रपती शाहू महाराजांनी समाजाला घडवण्याचे ऐतिहासिक कार्य केले होते. अस्पृश्य निवारण करण्यासाठी त्यांनी आंतरजातीय सामुदायिक विवाह करण्याची गरज आहे त्यामुळे स्वतःची चुलत बहीण चंद्रप्रभाबाई घाटगे यांचा विवाह यशवंतराव होळकर यांच्या सोबत लग्न लागून मराठा आणि धनगर यांचा समोर मोठा आदर्श निर्माण करून दिलेला आहे. असे प्रतिपादन ठाण्यातील अधिवक्ता ड. प्रज्ञेश चैतन्य सोनावणे हे छत्रपती शाहू महाराज यांची शतकोत्तर सुवर्ण जयंती महोत्सव कार्यक्रमात केले. ड. प्रज्ञेश सोनावणे म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शाहू महाराज यांचे संबंध जिव्हाळ्याचे होते. मूकनायक वर्तमानपत्राला छत्रपती शाहू महाराजांनी आर्थिक मदत केली होती. त्याचबरोबर छत्रपती शाहू महाराजांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारताचे पुढारी म्हणून संबोधित करून देशाला नवा उद्धारक मिळाले याची खात्री करून दिली. त्याचप्रमाणे आजच्या आरक्षणाचा मुद्दा हा सामाजिक विचार परिवर्तनातूनच प्रश्न सुटणारा आहे, असेही ड. प्रज्ञेश सोनावणे यांनी विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी स्थानिक दहावीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आले होते. त्यांना पुष्पगुच्छ आणि भारतीय संविधानाची प्रस्तावना फ्रेम देऊन गुणगौरव करण्यात आले होते.वंचित बहुजन आघाडी भिवंडी शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक, शिवसेना भवन हॉल मध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.याप्रसंगी प्रमुख म्हणून अनंत सोनवणे, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप जाधव, संविधान अभ्यासक विनायक जाधव, ड. वैभव जाधव, शाहूराज साठे, उपस्थित होते. तर यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डी .एस. गायकवाड, आशाताई पाटील. भारतीय बौद्ध महासभेचे भिवंडी तालुकाध्यक्ष रोहित जाधव, पत्रकार मोनिश गायकवाड, मेनका शिरसाट, सुरेखा खेत्रे, कवी संदीप कांबळे तर आदी उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वंचित बहुजन आघाडी भिवंडी शहर अध्यक्ष प्रदीप शिर्के , उपाध्यक्ष आकाश गायकवाड उपाध्यक्ष मोहम्मद शरीफ ,भगवान बचूटे, नूर मोहम्मद ,प्रमुख सल्लागार श्रीपत तांबे ,शाखा अध्यक्ष संजय पाटेकर यांनी मेहनत घेतली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय जाधव यांनी केले. तर यावेळी आभार प्रदर्शन प्रदीप शिर्के यांनी केले.

## श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यानिमित्त वाहतूक मार्गात बदल

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दिनांक ६ जुलै ते ११ जुलै २०२४ या कालावधीत सातारा जिल्ह्यातील लोणंद,फलटण शहर, फलटण ग्रामीण पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातून मार्गक्रमण करणार आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यास सोलापूर जिल्ह्यातून सातारा जिल्हात जाणाऱ्या वाहनांचा अडथळा येऊ नये यासाठी दिनांक ६ जुलै ते ११ जुलै २०२४ पर्यंत अत्यावश्यक सेवेची वाहने वगळून इतर सर्व वाहनांच्या वाहतूक मार्गात बदल करण्यात येणार आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ च्या कलम ३३ (१) (ब) अन्वये प्राप्त अधिकारान्वये आदेश पारीत केले आहेत. नातेपुते-फलटण मार्गे पुण्याकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येऊन ती वाहतूक नातेपुते-दहिगांव-जांब- बारामती मार्गे पुणे या पर्यायी मार्गाने मार्गस्थ होतील. तसेच सातारकडे जाणाऱ्या वाहनांसाठी वाहतूक बंद करण्यात येणार असून सदर वाहने शिंगणापूर तिकाटने- दहिवडी मार्गे सातारकडे मार्गस्थ होतील.

## सहदेव लाड यांच्या आंदोलनाच्या पुढे नरमले आरोग्य प्रशासन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा/राहुल साबळे

बीबी ग्रामीण रुग्णालयातील विविध समस्या विषयी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष सहदेव लाड यांनी २४ जूनला बुलढाणा जिल्हाधिकारी व जिल्हा शैल्य चिकित्सक यांच्याकडे निवेदन देऊन रुग्णालयातील समस्या सोडवण्याची मागणी केली होती.

मागणी मान्य न झाल्यास १ जुलै रोजी ग्रामीण रुग्णालय बीबी येथे आंदोलन करण्याचा इशारा दिला होता, लोणार तालुक्यातील सर्वात मोठे तीस खाटांचे रुग्णालय म्हणून जिल्ह्यात ओळख असणाऱ्या बीबी ग्रामीण रुणालय मध्ये गेल्या एक वर्षापासून रक्त लघवी तपासणी मशीन बंद होती रुग्णांना बाहेरील तपासणी केंद्रा मधून रक्त लघवी तपासणी करावी लागत होती त्याचा गोरगरीब



रुग्णांना आर्थिक भुर्दंड पडत होता तसेच रुणालयामध्ये फक्त एकच वैद्यकीय अधिकारी हे उपस्थित राहत होते त्यामुळे रुणालयामध्ये उपचार घेण्यासाठी आलेल्या रुग्णांची मोठी हेंडसळ होत होती तरी रुणालयामध्ये रक्त लगीन तपासणी मशीन व वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी स्वाभिमानीचे जिल्हा उपाध्यक्ष सहदेव लाड यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता सदर आंदोलनाच्या धसक्याने जिल्हा आरोग्य विभागाने रक्त लघवी तपासणी मशीन उपलब्ध करून देऊन चार वैद्यकीय अधिकाऱ्यांची सुद्धा ग्रामीण रुणालय मध्ये नेमणूक केली आहे तसे लेखी पत्र आरोग्य विभागाच्या वतीने डॉक्टर शहा यांनी ग्रामीण रुणालय बीबी येथे सहदेव लाड यांच्यासोबत चर्चा करून दिले आहे यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे लोणार तालुका उपाध्यक्ष आणिल लांडगे कार्तिक धाईत व आरोग्य विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते

## कोर्टी येथील रस्त्याचे महेश साठे यांच्या हस्ते भूमिपूजन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः कोर्टी तालुका पंढरपूर येथील मुसलमान एडगे वस्ती ते जुम्मा शेख वस्ती मुसलमान वस्ती ते लायकाली शेख वस्ती या ठिकाणच्या रस्त्याची भूमिपूजन जिल्हा नियोजन समितीचे सदस्य महेश साठे यांच्या हस्ते करण्यात आले

या रस्त्यामुळे या ठिकाणच्या लोक वस्तीवरील पाचशे लोकांची सोय झाली आहे कित्येक वर्षाची होणारी गैरसोय हा रस्ता झाल्यामुळे थांबणार आहे रस्त्यासाठी जिल्हा नियोजन फंडातून जिल्हा नियोजन समितीचे सदस्य तथा सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख (शिंदे शिवसेना) महेश नाना साठे या दोन



रस्त्यासाठी प्रत्येकी दहा लाख रुपये त्यांच्या निधीतून मंजूर केले आहेत गेले दोन वर्षांमध्ये महेश साठे यांनी टाकळी व कोर्टी गादेगाव भवाळी उंबरगाव सोनकी तपकिरी शेटफळ या गावांना विकास निधी देण्याची भूमिका आगरक्रमाने घेतली आहे या भूमिपूजन प्रसंगी कोर्टी गावचे सरपंच राजाभाऊ पवार माजी उपसरपंच तथा सदस्य महेश शेडगे ग्रामपंचायत सदस्य बबलू शेख रफिक भाई शेख इस्माईल शेख असलम शेख विजय काळे हरून मुजावर अन्वर मुजावर सोहेल मुजावर मोहम्मद शेख राजाबाई शेख आदी ग्रामस्थ मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते